**डिले यूएलपी क्र.०१/२०१८**
**निशाणी क्र. :—यू—७**

गौतम ज्ञानू लोखंडे वि. सामाजीक वनीकरण

मेमोरॅडम

मी शपथपूर्वक सांगतो की,

नाव :— गौतम ज्ञानू लोखंडे

**सामनेवालातर्फे अॅड. श्रीमती.एस.ए.शिंदे यांच्याकडून उलटतपास शपथेवर सुरु**

खरे नाही मी रोजंदारीवर वन मजूर म्हणून काम करीत होतो. मी सांगली येथील न्यायालयात १३५/१९९० यूएलपी तक्रार दाखल केली होती. सदरचे प्रकरण या न्यायालयात वर्ग करण्यात आले. खरे नाही सदर प्रकरणात मी कधीही हजर राहिलो नाही. सदरचे प्रकरण १५/१२/१९९४ ला निकाली काढण्यात आले. ते रिस्टोअर करण्यासाठी १/१९९५ असे प्रकरण दाखल केले. खरे नाही सदरचे प्रकरण मी चालवले नाही. खरे नाही मी त्या प्रकरणात वारंवार गैरहजर होतो. माहित नाही की सदरच्या प्रकरणात निशाणी यू—३१ वर माझे वकीलांनी नो इन्स्ट्रक्शन पुरसीस दाखल केली. २९/०४/२००३ ला सदरचे प्रकरण डिसमीस इन डिफॉल्ट करण्यात आले. पुन्हा मी सदर प्रकरण रिस्टोअर करण्यासाठी अर्ज क्र. २/२०१० दाखल केला. सदरचा अर्ज ०६/१२/२०१४ ला डिसमीस झाले. खरे नाही मला केस चालवण्यामध्ये रस नव्हता. खरे नाही माझे अर्जातील पॅरा क्र. ३, ४ व ५ मधील कारणे खोटी आहेत. मी दाखल केलेली निशाणी यू—६ वरील कागदपत्रे पहिल्यांदाच दाखल केलेली आहेत.

माझे मुलाच्या आजाराबाबत व माझा पत्ता बदलल्याबाबतचा पुरावा मी यापुर्वीच्या प्रकरणात दाखल केलेला नाही. माझा मोठा मुलगा २७ वर्षाचा आहे. मी मुलांमार्फत न्यायालयात अर्ज पाठवला नाही साक्षीदार सांगतो की मी स्वत: वकीलांशी संपर्क केला खरे नाही माझे सदरचे कथन खोटे आहे. माझी पत्नी

२००६ पासून आजारी होती. खरे नाही निशाणी यू—६ वरील कागदपत्रात २००६ ते २०१६ या कालावधीची वैद्यकीय कागदपत्रे नाहीत. सदरची कागदपत्रे ५६/१९९० या प्रकरणात दाखल केली नाहीत. अर्ज क्र. १/१९९५, अर्ज क्र. २/२०१० या प्रकरणात मी वैद्यकीय पुरावा दाखल केला नव्हता. खरे नाही निशाणी यू—६ सोबत फेब्रुवारी २०१६ नंतरची कागदपत्रे दाखल आहेत. १९/०३/२००९ ला डॉ. साठे याचेकडे पत्नीला दाखवले होते. खरे नाही त्यापुर्वीची वैद्यकीय कागदपत्रे रेकॉर्डवर नाहीत. खरे नाही वैद्यकीय पुरावा खोटा दाखल केला आहे. खरे नाही मला प्रकरण दाखल करण्यास २८ वर्षाचा विलंब झालेला आहे. खरे नाही माझे निष्काळजीपणामुळे विलंब झालेला आहे. खरे नाही खोटा पुरावा दाखल केलेला आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपासणी :— नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/—

दिनांक :११/०२/२०२०
सातारा.

( ए. आर. कांबळे )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सातारा.